मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन

कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. मत्स्यआ २०२५/प्र.क्र.११/पदुम-१२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :</u> १. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२, दिनांक २५.०५.२००६

२. कृषि व पदुम विभाग, शासन आदेश, क्र.मत्स्यआ- २०२५/प्र.क्र.११/पदुम-१२, दि.२०.०५.२०२५

३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.मत्स्यआ-२०२१/प्र.क्र.१४८/पदुम-१२, दि.१७.१२.२०२५

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदलीचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरीता अधिनियम, २००५ अंमलात आला आहे. या अधिनियमातील कलम-६ मधील परंतुक २ व कलम ७ मधील तरतूदीनुसार मत्स्यव्यवसाय विभागातील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यास सक्षम प्राधिकारी संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्याबाबतच्या आदेशामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

मत्स्यव्यवसाय विभागातील गट-क व गट-ड कर्मचा-यांच्या बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्याबाबतचे या विभागाचे क्र.मत्स्यआ २०२५/प्र.क्र.११/पदुम-१२, दिनांक २०/०५/२०२५ चे शासन आदेश रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम-६ मधील परंतुक २ व कलम-७ नुसार मत्स्यव्यवसाय विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत.

अ. क्र.	संवर्ग	महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी	दिनांक २०/०५/२०२५ च्या शासन निर्णयान्वये बदली करण्याचा अधिकार प्रत्यार्पित केलेले प्राधिकारी	या शासन आदेशान्वये बदली करण्याचे अधिकार पुन:र्स्थापित करावयाचे प्राधिकारी
१.	रु. ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० व त्यापेक्षा कमी वेतनश्रेणी असलेले गट-ब (अराजपत्रित) व गट-क मधील सर्व कर्मचारी (सातव्या वेतन आयोगातील S-१४ व त्यापेक्षा कमी	आयुक्त मत्स्यव्यवसाय, आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई	अप्पर मुख्य सचिव (मत्स्य) /प्रधान सचिव (मत्स्य)/ सचिव (मत्स्य)	मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय)

	वेतनश्रेणी असलेले गट-ब (अराजपत्रित) व गट-क मधील सर्व कर्मचारी)			
२.	रु. ४४४०-७४४० ग्रेड पे-१९०० व त्यापेक्षा कमी वेतनश्रेणी असलेले गट-ड मधील सर्व कर्मचारी (सातव्या वेतन आयोगातील S-३ व त्यापेक्षा कमी वेतनश्रेणी असलेले गट-ड मधील सर्व कर्मचारी)	प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई/ पुणे/ नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ लातूर/ अमरावती/ नागपूर	आयुक्त मत्स्यव्यवसाय, आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई	आयुक्त मत्स्यव्यवसाय, आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०४११०८२५४८४५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.08.04 17:27:44 +05'30'

(कि. म. जकाते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) महोदयांचे प्रधान सचिव
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औफाक विभाग) महोदयांचे प्रधान सचिव
५) मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
१३) प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, सर्व
१४) संबंधित अधिकारी (आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचेमार्फत)
१५) निवडनस्ती पदुम-१२.